## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**<u>प्रस्तावना</u> :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.१ कार्यक्षेत्रातील वंजानपट्टीनाका अपनी हॉटेल ते मीत मेडीकल,चाविंद्रा पर्यंत जिओ, डिजीटल फायबर प्रा.लि.मुंबई यांनी रस्ता खोदाई केलेल्या ठिकाणचा रस्ता दुरुस्त करणे.**

जिओ, डिजीटल फायबर प्रा.लि.मुंबई यांनी प्रभाग समिती क्रं.१ कार्यक्षेत्रातील विषयांकीत ठिकाणी केबल टाकणेकामी एकुण १८९० मीटर रस्ता खोदकाम करण्यास परवानगी अपक्षिलेली आहे. विषयांकीत कामाचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला असता त्यास मंजुरी प्राप्त झाली असल्याने रस्ता खोदाई करीता सुधारित दराने एकुण शुल्क रक्कम रु.२,६६,४७,११० (दोन कोटी सहासष्ठ लाख सतेचाळीस हजार एकशे दहा मात्र) संस्थेने मनपा फंडात जमा केलेली आहे.

विषयांकीत ठिकाणी जिओ, डिजीटल फायबर प्रा.लि.मुंबई यांनी रस्ताखोदाई केल्यानंतर सदर रस्ता दुरुस्ती करणे आवश्यक आहे, अन्यथा सदरचा रस्ता मुख्य दळणवळणाचा असल्याने नागरीकांना रहदारीस त्रास होईल व संपुर्ण रस्ता नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. रस्ता खोदाई केल्यानंतर नागरीकांची रस्ता दुरुस्तीकामी मागणी होत असते. खराब रस्त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने व नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी सदरचे रस्ते खोदाई केल्यानंतर दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.

विषयांकीत कामाचा रक्कम रु.१,३३,१४,६६६/- (अक्षरी रु.एक कोटी तेहतीस लाख चौदा हजार सहाशे सहासष्ठ मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.२१/०१/२०२५रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** 022 **दिनांक :-**22/09 **/२०२५**

प्रभाग समिती क्रं.१ कार्यक्षेत्रातील वंजानपट्टीनाका अपनी हॉटेल ते मीत मेडीकल,चाविंद्रा पर्यंत जिओ, डिजीटल फायबर प्रा.लि.मुंबई यांनी रस्ता खोदाई केलेल्या ठिकाणचा रस्ता दुरुस्त करणे याकामी रक्कम रु.१,३३,१४,६६६/- (अक्षरी रु.एक कोटी तेहतीस लाख चौदा हजार सहाशे सहासष्ठ मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रक्कम रु.१,३३,१४,६६६/- (अक्षरी रु.एक कोटी तेहतीस लाख चौदा हजार सहाशे सहासष्ठ मात्र) खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**